सिपना महाविद्यालय कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या. चिखलदरा.
ता. चिखलदरा, जि. अमरावती.

# कर्मचारी सहकारी पत संस्था म.

ता. चिखलदरा, जि. अमरावती.

# पोटनियम

सहायक निबंधक सहकारी संस्था

ता. अचलपुर, जि. अमरावती

[illegible] सहकारी पत संस्था मर्यादीत [illegible] ची

# उपविधी

(सुचना :- या उपविधित दिलेल्या अधिनियमांचा व नियमांचा उल्लेख हा अनुक्रमे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखाली केलेले नियम १९६१ यांचा उल्लेख आहे असे समजावे.)

## १) प्रस्तावना

१) संस्थेचे नाव :- [illegible] सहकारी पत संस्था मर्यादीत असे आहे व तीचा नोंदलेला पत्ता -गांव [illegible] पोस्ट [illegible] तालुका [illegible] जिल्हा आहे.

उपविधीत नोंदलेला संस्थेचा पत्ता लेखी लिहुन मे.असिस्टंट रजिस्ट्रार व खात्याचे ऑडीटर साहेब यांना नियम क्रमांक ३१ मधील तरतुदी प्रमाणे कळविला जाईल. पत्यात बदल झाल्यापासून तीस दिवसाचे आत, तो बदल अधिनियम क्रमांक १७ व क्रमांक ३१ मधील तरतुदी नुसार त्यांना कळविला जाईल, नियमानुसार उपविधीत पत्त्याची दुरुस्ती केल्याशिवाय तो बदल नोंदला असे समजण्यात येणार नाही.

अ) मे असि रजिस्ट्रार यांच्या आगाऊ परवानगीने संस्थेस आपल्या शाखा सुरु करता येतील व त्यांचा पत्ता व त्यात होणारे बदल उपविधी क्रमांक १ मध्ये नमुद केल्याप्रमाणे वेळोवेळी कळविले जातील.

## २) उद्देश

१) संस्थेचे उद्देश खालील प्रमाणे असतील :-

१) सदस्या मध्ये काटकसर स्वावलंबन व सहकार यांचा प्रसार करण्यास उत्तेजन देणे.

२) संस्थेच्या सदस्यांच्या गरजा भागविण्याकरीता उपविधी क्रमांक ७ मध्ये नमूद केलेल्या साधनांनी भांडवल जमविणे.

३) मे. असि /डेप्युटी . रजिस्ट्रार यांनी मंजुर केलेल्या विनीमयानुसार सदस्यांच्या वतीने देशातील, परदेशातील काही मुदतीच्या हुंड्यां वटविणे.

४) संस्थेच्या सदस्यांच्या वतीने घरगुती आणि ईतर जीवनोपयोगी वस्तूंची खरेदी व वाटप करण्याकरीता अभिकर्ता (एजंट) म्हणून काम करणे, तसेच सरकार कडून अगर स्थानिक प्राधिकाऱ्याकडून सोपविलेले माल वाटपांचे व विक्रीचे काम करणे

५) मालसाठा व विक्रीकरीता दुकाने व कोठारे बांधणे अगर भाड्याने घेणे.

६) मालाचे तारणावर आगाऊ रक्कमा (अॅडव्हान्सेस) देणे.

७) सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याकरीता व त्यायोगे उत्पादन वाढीत व कार्यक्षमतेस प्रोत्साहन मिळेल अशा रीतीने कर्जपुरवठा करणे.

८) वरील क्रमांक १ ते ७ यात नमुद केलेल्या उद्देशांच्या पुर्ततेसाठी जरूर भासणारी इतर कामे हाती घेणे.

२ (अ) उपविधीत काहीही नमुद केले असले तरी सदस्यांची व त्याचे अनुषंगाने जनतेची राहणी, उद्योगधंदा व उत्पादन पध्दती यात सुधारणा घडवून आणण्यासाठी मे. असि / डेप्युटी रजिस्ट्रार यांनी पंसत केलेल्या विनिमयानुसार व ते वेळोवेळी घालतील त्या अटी व मर्यादानुसार इतर कोणतेही धंदे व योजना संस्थेच्या समितीस हाती घेता येतील अगर अशा धंद्यास व योजनास भांडवल पुरविता येईल.

## ३) भांडवल

खालील साधनांनी भांडवल जमा केले जाईल.

अ) भागांच्या रुपाने :- १) सदस्यांकडून २) सरकारकडून ३) जिल्हा केंद्रिय सहकारी बँकेमार्फत

ब) वर्गणीच्या रुपाने :-१) सदस्यांकडून

क) ठेवीच्या रुपाने :- १) सदस्यांकडून "२) सदस्य नसलेल्या व्यक्तीकडून

३) इतर सहकारी संस्थाकडून ४) समाजसेवी संस्थाकडून

ड) कर्जाच्या रुपाने.

इ) देणगीच्या रुपाने.

फ) प्रवेश फी च्या रुपाने.

वरील 'क' आणि 'ड' या साधनांनी जमविण्याचे भांडवल हे मे. असि/ डेप्युटी रजिस्ट्रार यांचे आगाऊ परवानगीशिवाय भागाचे वसूल झालेले भांडवल, साठविलेला राखीव निधी व इमारत निधी यांच्या बेरजेतून साचलेले तोटे वजा जाता राहीलेल्या रकमेच्या दहापटीहून जास्त राहणार नाही. संस्थेच्या भांडवलाचा, उपयोग मुख्यत: तिच्या सदस्यांच्या आर्थिक गरजा भागविण्याकरीता त्यांना कर्जे देण्याकडे केला जाईल.

संस्थेचे भागभांडवल संस्थेच्या व्यवहारात गुंतलेले नसेल तेव्हा अधिनियम कलम क्रमांक ७० अन्वये ते गुतांवले जाईल, परंतु इंडियन ट्रस्ट ॲक्टच्या कलम २० (६) प्रमाणे गुतंविले जाणार नाही.

टीप :- या उपविधीत योजलेल्या "व्यवहार" या शब्दात मे. असि डेप्युटी रजिस्टर यांचे आगाऊ मंजुरीने संस्थेच्या चालू व्यवहारातील येणे कर्जे वसूल करण्याकरीता स्थावर जिंदगीत अगर संस्थेच्या स्वतचे उपयोगासाठी इमारत अगर इमारती बांधण्याचे कामात केलेल्या गुंतवणूकीचा समावेश होतो.

## ४) सदस्यत्व

४) उपविधी क्रमांक ५ मधील अटींना पात्र राहून ज्या कर्मचाऱ्यांची नौकरी कमीतकमी ............ वर्षे झाली आहे व जो पूर्ण कालीन नोकरीवर नियुक्त केला गेला आहे त्या कर्मचाऱ्यास संस्थेचे संदस्य होता येईल. मात्र या संस्थेच्या कार्यक्षेत्रात एखादी याच प्रकारची संस्था असल्यास अगर स्थापन झाल्यास तिचे कार्यक्षेत्र या संस्थेच्या कार्यक्षेत्रातून वगळले जाईल. या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादीत असेल.

५) नियम क्रमांक १९ अन्वये घातलेल्या व खालील अटी पुऱ्या केल्या खेरीज कोणाही इसमास संस्थेचे सदस्य होता येणार नाही :-

१) तो पूर्ण १८ वर्षे वयाचा व करार करण्यास लायक असला पाहिजे.

२) त्याने उपविधी क्रमांक ४ मधील अटी पूर्ण केल्या असल्या पाहिजे.

३) तो चांगल्या वर्तणुकीचा असला पाहिजे.

४) त्याची पत चांगली असली पाहिजे व त्याचेकडे सरकारी बाकी बिगर परवानगीने थकलेली नसली पाहिजे किंवा त्याचेवर दिवाणी कोर्टाचा हुकूमनामा नसला पाहिजे.

५) मे.असि/डेप्युटी रजिस्ट्रार यांनी कळविलेल्या नमुन्यात त्याने सदस्यत्वाकरीता अर्ज दिला असला पाहिजे.

६) मे. आसि /डेप्युटी रजिस्ट्रार यांनी ठरविलेल्या नमुन्यात त्याने आपल्या जिंदगी व कर्जाचे खरे पत्रक दिले असले पाहिजे .

७) संस्थेचे उद्देश त्यास समजले असले पाहिजे.

८) त्याचा सदस्य होण्याबद्दल लेखी अर्ज समितीतील एकूण सदस्यांच्या निम्याहून अधिक बहुमताने मंजूर केला असला पाहिजे.

९) त्याने ५ रुपया प्रवेश फी दिली असली पाहिजे

१०) त्याने निदान एक तरी भाग घेऊन त्याची पूर्ण रक्कम भरली असली पाहिजे.

११) तो ________________________________________________

संस्थेत कमीत कमी ............ वर्षे पूर्णकालीन नोकरीत असला पाहिजे व त्याची नोकरी कायम असली पाहिजे.

१२) अधिनियम ४ नियम व उपविधी यातील अटी त्याने पूर्ण केल्या असल्या पाहिजेत.

१३) तो समान उद्देश असलेल्या इतर संस्थेचा सदस्य नसला पाहिजे.

१४) त्याचे वेतन अदा करणाऱ्या अधिकाऱ्यास त्याचे वेतनातून संस्थेच्या कर्जाची, कर्जव्याजाची, वर्गणीची व इतर रक्कम कापून घेण्यास त्याने लेखी अधिकार पत्र (परत घेता येणार नाही असे ) लिहून दिले असले पाहिजे. वरील क्रमांक ५ व ८ मधील अटी सस्था नोदंविण्यासाठी केलेल्या मुळच्या अर्जावर ज्यांच्या सह्या असतील त्यांना लागू असणार नाहीत.

५) अ) "सहकारी सदस्य" नाममात्र सदस्य "अगर"सहानभुती असलेला सदस्य म्हणून एखाद्या इसमास त्याचे लेखी अर्जावरुन अधिनियम क्रमांक २४ मधील तरतुदीनुसार सदस्य करुन घेता येईल मात्र त्याने उपविधी ५ मधील क्रमांक ६ व १० वगळता इतर सर्व अटी पूर्ण केल्या असल्या पाहिजे. अशा सदस्याचे संस्थेशी होणारे व्यवहार व संस्थेतील त्याचे अधिकार अधिनियम कलम अनुक्रमे क्रमांक २४ व २७ (८) मधील तरतूदींना अनुसरुन मर्यादित स्वरुपाचे असतील. त्याहून जादा असणार नाहीत.

६) मयत सदस्यांचे भाग अगर हितसंबंध वारसा हक्काने मिळविणारे अज्ञान अगर वेडसर इसम यांना अनुक्रमे त्याचे कायदेशीर प्रतिनिधीचे अगर पालक यांचे मार्फत नियम व उपविधी यात सदस्य करुन घेण्यासंबंधी ठरविलेल्या कार्यपध्दतीनुसार नियम क्रमांक २० प्रमाणे सदस्य करुन घेता येईल आणि अधिनियम व नियमानुसार उपविधीत नमुद केलेल्या हक्कांचा व जबाबदाऱ्यांचा उपभोग त्यांचेमार्फत घेता येईल.

७) एखाद्या अर्जदारास सदस्य करुन घेण्याचा निर्णय तो निकालाचे तारखेपासून १५ दिवसाचे आत अगर सदस्य होण्याकरीता केलेल्या आजचे तारखेपासुन तीन महिन्याचे आत जी मुदत लवकरची असेल ती त्या अर्जदाराला कळविली जाईल. या मुदतीच्या आत अर्जदारास निर्णय कळविलेला नसल्यास निर्णय अर्जदाराचे बाजुचा आहे असे अर्जदाराने समजावे. अर्जदाराला अधिनियम कलम क्रमांक २३ मधील तरतुदीनुसार मे.रजिस्ट्रार यांचे कडे या निर्णया विरुध्द अपील करता येईल.

अ) जमीन विकास बँक, केंद्रिय सहकारी बँका अगर बाजार संस्था सोडून इतर कोणत्याही कर्ज पुरवठा करणाऱ्या एकापेक्षा जास्त समान संस्थेच्या सदस्य असणाऱ्या प्रत्येक इसमाने जर यापूर्वीच प्रतिज्ञापत्र केले नसले तरी नियमातील "क" नमुन्यात मी फक्त एकाच संस्थेकडून कर्ज घेईल असे प्रतिज्ञापत्र लिहून देऊन नियम क्रमांक ४५ मधील तरतूदीनुसार ते पाठविले पाहिजे व तसे त्याने न केल्यास त्या नियमानुसार त्यांचे विरुध्द उपाययोजना केली जाण्यास तो पात्र ठरेल.

८) सदस्यांची जबाबदारी त्याने घेतलेल्या भागांच्या रकमेपैकी न भरलेल्या रकमे इतकी राहिल व सदर रकमेस तो व त्याची जिंदगी जबाबदार राहिल.

९) सेक्रेटरीस तीन महिन्याची लेखी नोटीस देऊन कोणत्याही सदस्यास आपले नाव (अंग) संस्थेतून काढून घेता येईल. मात्र तसे करण्यापूर्वी त्याचेकडे येणे असलेल्या रकमांची पूर्ण फेड झाली असली पाहिजे व जामीनकीच्याही जबाबदारीतून तो मुक्त झाला असला पाहिजे. नियम क्रमांक २१ मधील व उपविधीतील तरतूदी, राजीनामा मंजूर करतांना विचारात घेतल्या जातील.

१०) साधारण सभेत हजर असणाऱ्या व मताचा अधिकार असणाऱ्या सदस्यांच्या संख्येच्या ३/४ सदस्यांच्या मताने कोणत्याही सदस्यास खालील पैकी कोणत्याही कारणा करीता संस्थेतून काढून टाकता येईल.

अ) जर तो आपली बाकी सतत थकविणारा असेल अगर सदस्यांच्या अटी पाळीत नसेल.

ब) जर समितीच्या मते तो संस्थेच्या हिताविरुध्द काही कृत्य करीत असेल अगर संस्था व्यवस्थीतशीर चालण्यात अडथळे आणीत असेल अगर खोटे लेख लिहून प्रसिध्द करीत असेल.

क) जर समितीच्या मते त्याने संस्थेला बदनाम केले असेल अगर संस्थेला कमीपणा आणला असेल.

ड) जर संस्थेशी होणाऱ्या त्याच्या व्यवहारांच्या बाबीसंबंधी उपविधीचे उल्लंघन केले असेल.

इ) जर त्याने भागाचा हप्ता अगर लागोपाठ ३ महिन्याची वर्गणी थकविली असेल.

फ) जर त्याचे दिवाळे निघाले असेल अगर तो कायद्याने नालायक ठरला असेल.

गं) जर त्याला फौजदारी गुन्ह्याबद्दल शिक्षा झाली असेल.

कोणत्याही सदस्यात संस्थेतून काढून टाकतांना अधिनियम कलम क्र.३५ व नियम क्रमांक २८ व २९ मधील तरतुदी विचारात घेतल्या जातील व त्यात नमुद केलेल्या कार्यरीतीचा अवलंब केला जाईल. काढून टाकलेल्या सदस्यांस तरतुदीनुसार पुन्हा सदस्य करता येईल.

११) खालील कारणामुळे एखाद्याचे सदस्यत्व बंद करता येईल.

अ) त्याने सदस्यत्वाचा दिलेला राजीनामा मंजूर झाल्यास.

ब) त्याचे नावावरील सर्व भाग अगर हितसंबंध दुसऱ्याचे नावावर हस्तांतरीत झाल्यास.

क) तो मयत झालेला असल्यास.

ड) त्यास संस्थेतून काढून टाकलेले असल्यास.

ई) संस्थेच्या कार्यक्षेत्राबाहेर तो नेहमी राहत असल्यास.

फ) त्याला कायमचे वेड लागले असल्यास.

ग) सेवेतून कायमपणे तो मुक्त अगर कमी झाल्यास.

१२) नियम व अधिनियमात ठरविलेली रक्कम भरल्याशिवाय अगर ठरविलेला हितसंबंध संस्थेत मिळविल्याशिवाय, तसेच अधिनियम कलम क्रमांक ४९ मधील तरतूदीनुसार प्रतिज्ञापत्र लिहून देण्याची जरुरी असल्यास ते लिहून दिल्याशिवाय कोणाही इसमास सदस्यांचे हक्क बजावता येणार नाही.

## ५) भाग

१३) प्रत्येक भागाची दर्शनी किमंत रु.- ..10.... राहील. एकुण भागभांडवलाची कमाल मर्यादा ....... रु. राहील तसेच एकून भागांची संख्या ............ राहील. प्रत्येक भागांची रक्कम सदस्याने भाग मंजूर होताच एकदम भरली पाहिजे. भागाची पूर्ण रक्कम जमा झाल्यावर भाग अदा केला जाईल. ठरल्याप्रमाणे हप्ते भरले न गेल्यास भागाकरीता भरलेली रक्कम जप्त होण्यास पात्र होईल.

१४) प्रत्येक सदस्यांने दरमहा एकूण पगाराच्या दर ....... रुपयामागे रु. .।००.. या दराने मासिक वर्गणी भरली पाहिजे. जमा झालेली संपूर्ण रक्कम प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चला भाग भांडवलात अगर क्युम्युलिटिव्ह टाईम डिपॉझिट अगर बचत खात्यात रुपांतरीत केली जाईल.

अ) सदस्यांचे एकूण भाग भांडवल संस्थेच्या वसूल भागभांडवलाच्या १/५ परंतु रु. २०.००० होईपर्यंत जास्तीत जास्त मासिक वर्गणी भाग भांडवलात रुपांतरीत करण्यात येईल.

ब) सदस्याचे एकून भाग भांडवल वरील मर्यादेपर्यंत पूर्ण झाल्यावर मासिक वर्गणी सी.टी.डी. (क्युम्युलेटिव्ह टाईम डिपॉझिट) मध्ये रक्कम रु २०,००० होईपर्यंत रुपातंरीत केली जाईल.

क) वरील दोन्ही मर्यादा पूर्ण झाल्यावर जमा होणारी मासिक वर्गणी सभासदांच्या बचत खात्यात जमा केली जाईल. बचत खात्यातील जमा रकमेवर कोणतीही कमाल मर्यादा राहणार नाही. संस्थेने केलेल्या नियमानुसार सदस्यास गरज भासल्यास बचत खात्यातून पैसे काढता येतील.सदस्यांच्या बचत खात्यात कमीत कमी रु २० असले पाहिजेत.वर्षातून जास्तीत जास्त तीनदा बचत खात्यातून पैसे काढता येतील.

१५) कोणत्याही सदस्यास मासिक वर्गणीच्या माध्यमातून खरेदी केलेल्या भागाव्यतिरीक्त नगदी पैसे भरुन भाग खरेदी करता येतील. मात्र कोणीही सदस्यास संस्थेच्या वसूल भागभांडवालाच्या १/५ पंरतु जास्तीत जास्त रु. २०.००० रुपयापेक्षा जास्त किमतीचे भाग धारणा करता येणार नाहीत.

१६) मासिक वर्गणीच्या माध्यमातून खरेदी केलेल्या भागाव्यतिरीक्त खरेदी करावयाच्या भागासाठी सदस्याने लेखी अर्ज समितीकडे केला पाहिजे . समितीने अशा अर्जाचा निकाल केला पाहिजे.

१७) एकाच तारखेस विकत घेतलेल्या प्रत्येक भागाबद्दल निराळा क्रमांक असलेला भागाचा दाखला दिला जाईल. अथवा एकापेक्षा जास्त भाग घेतले असल्यास त्या सर्व भागाबद्दल निरनिराळे क्रमांक देऊन भागांचा एकत्रित एकच दाखला दिला जाईल.

१८) भागाचे हस्तांतरण अधिनियम कलम क्रमांक ३० व नियम क्रमांक २४ ते २६ यामधील तरतुदीनुसार केले जाईल.

१९) कोणाही सदस्यास संस्थेमध्ये कमीतकमी १ वर्षभर भाग धारण केल्याशिवाय तो हस्तांतरीत करता येणार नाही. समितीच्या मंजूरीने दुसऱ्या सदस्यांस अगर ज्याचा सदस्यत्वाचा अर्ज समितीने मंजूर केला असेल अशा इसमास भाग हस्तांतरीत करता येईल. प्रत्येक भाग हस्तांतरीत करण्याकरीता संस्था ठरविल ती फी आकारली जाईल. ज्याचे नावे भाग हस्तांरीत केला त्याचे नांव भागाच्या हस्तांतरण नोंदणी पुस्तकात दाखल केल्याखेरीज भागाचे हस्तांतरण करणाऱ्याने संस्थेची आपली देणी भागविल्याखेरीज भागाचे हस्तांतरण पूर्ण होणार नाही. सरकारने केंद्रिय बँकेमार्फत खरेदी केलेला भाग हस्तांतरीत करतांना हे निर्बंध लागू असणार नाहीत.

२०) कोणाही सदस्यास आपल्या सहिचा लेख संस्थेजवळ ठेवून अगर त्या कामासाठी ठेवलेल्या कोणत्याही पुस्तकात निवेदन नमुद करुन संस्थेचा पगारी अधिकारी इसम खेरीज करुन इतर कोणत्याही इसमाची नियम क्रमांक २५ मधील तरतुदीनुसार मरणानंतर सस्थेत असणाऱ्या आपल्या भागाचे अगर हितसंबंधाचे वारसदार म्हणून नेमुणूक करता येईल ती केलेली नेमणुक परत घेता येईल अगर तीच्यात बदल करता येईल. अशा पहिल्या नेमणुकीकरीता फी आकारली जाणार नाही. पण या नेमणुकात कोणाताही फेरफार करण्याबद्दल अगर अशी नेणुमणुक करण्याबद्दल प्रत्येक वेळी संस्था ठरविल एवढी फी द्यावी लागेल.

२१) एखादा सदस्य मयत झाल्यानंतर त्याचे भाग अगर हितसंबंध त्याने नेमलेल्या वारसदाराचे नावे

हस्तांतरीत केले जातील. असा भागधारक मयत झाला असेल तर त्याचे भाग अथवा हितसंबंध अधिनियम कलम क्रमांक ३० व नियम क्रमांक २५ मधील तरतुदींनुसार त्याचे वारसाचे अथवा कायदेशीर प्रतिनिधीचे नांवे हस्तांतरित केले जातील. भाग हस्तांतरण करण्यापूर्वी त्या नेमलेल्या वारसास अथवा कायदेशीर प्रतिनिधीस संस्थेचे सभासद करून घ्यावे लागेल. त्याकरीता संस्थेने ठरविलेल्या नमुन्यात त्याने अर्ज केला पाहिजे व उपविधी क्रमांक ८ च्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत. सभासदत्वा करीता त्याला पुन्हा भाग विकत घेण्याची जरुरी नाही. मयताचे वारसास सभासद करून घेणे व मयताचे नावावर भाग हस्तांतरीत करणे दोन्ही बाबी एकाचवेळी पूर्ण केल्या जातील.

२२) एखादा सभासद मयत झाल्यानंतर त्याचे नावावर असलेल्या भागांच्या व हितसंबंधाच्या रकमेतून देय असलेली रक्कम वजा करून जे येणे असेल ते जमा करून राहिलेली बाकी त्याचे नेमून दिलेल्या वारसदारास अथवा वारसदार नसल्यास तर समितीच्या मते सभासदाचा जो कोणी योग्य वारस अथवा कायदेशीर प्रतिनिधी असेल त्यांचेकडून योग्य त्या प्रमाणात नुकसान भरपाईचा रोखा (इनडेम्निटी बॉन्ड) लिहून घेऊन त्याचे मागणी केल्यापासून तीन महिन्यांचे आत अधिनियम कलम क्र. २९ (क) नियम क्रमांक २५ मधील तरतुदीप्रमाणे दिली जाईल. मात्र मयत सभासदांची मुदतीची ठेव असल्यास ती मुदत संपल्यापूर्वी परत करता येणार नाही.

अ) सभासदत्वातून कमी झालेल्या इसमास, तो कमी झाल्याच्या तारखेपासून ६ महिन्यांचे आत त्याचे भागाची रक्कम त्याला दिली जाईल, मात्र त्याच्याकडे येणे असलेल्या रकमा त्या भागाच्या रकमेतून वजा करून घेतल्या पाहिजेत, तसेच कोणत्याही सालात परत करावयाचे भाग भांडवल हे संस्थेच्या त्या पूर्वीच्या ३१ मार्च रोजी असलेल्या एकूण भांडवलाच्या १० टक्क्यापेक्षा जास्त असता कामा नये.

टीप:- उपविधी क्रमांक २२ व २२(अ) चे कारणासाठी भागांची रक्कम परत करतांना सभासदांचे हितसंबंध नियम क्रमांक २३ मधील तरतुदींना अनुसरून केली जाईल व भागांची रक्कम देतांना योग्य [illegible] घेतली पाहिजे.

ब) संस्थेने जर सरकारी अगर पैसा पुरविणाऱ्या सहकारी बँकेचे कर्ज घेतले असेल तर [illegible] / डेप्युटी रजिस्ट्रार अगर अशी बँक यांच्या आगाऊ परवानगीशिवाय संस्थेस सभासदाचे भागाची रक्कम परत करता येणार नाही.

## ६) साधारण सभा

२३) संस्थेच्या सभासदांच्या साधारण सभेकडे संस्थेची अंतिम सत्ता राहील परंतु ती सत्ता अधिनियम नियम व उपविधी यातील तरतुदी अधीन राहील.

२४) संस्थेची पहिली साधारण सभा नियम क्रमांक ५९ मधील तरतुदी नुसार बोलविली जाईल व नियमातील तरतुदीनुसार कामे होतील.

२५) प्रत्येक वर्षी ३१ मार्च नंतर १५ ऑगस्टचे आंत अधिनियम कलम क्रमांक ७५ व नियम क्रमांक ६० मधील तरतुदीनुसार वार्षिक साधारण सभा बोलावली जाईल व त्यात तरतुदीनुसार त्या वर्षाचे नियम क्रमांक ६ मध्ये "ड" नमुन्यात तयार केलेली नफातोटा व ताळेबंद पत्रक तसेच समितीचे वार्षिक प्रतिवृत्त व हिशोब तपासनिसाचे प्रतिवृत्त साधारण सभेपुढे मंजुरीकरीता ठेवले जातील.

२६) साधारण सभेने करावयाच्या कामात खालील कामांचा समावेश होतो :-

१) संस्थेच्या मागील सालच्या कामांचा अधिनियम कलम क्रमांक ७५ मधील तरतुदीनुसार तयार केलेला अहवाल व नियम क्र. ६१ व ६२ मधील तरतुदीनुसार तयार केलेली त्या सालची जमा व खर्च, नफा व तोटा, आणि जिंदगी व कर्ज दाखविणारी पत्रके समितीकडून घेणे व ती सभेच्या विचारार्थाकरीता मंजूर करणे, अगर त्यात जरूर वाटतील त्या दुरुस्त्या करून मंजूर करणे.

२) नियम क्रमांक ५८ मधील तरतुदी विचारात घेऊन पुढील ५ (पाच) वर्षे करीता समितीची निवडणूक गुप्त मतदान पध्दतीने घेणेबाबत तजवीज करणे.

३) उपविधी क्रमांक ३ मधील मर्यादीस अधीन राहून पुढील वर्षाकरीता उभारावयाचा बाहेरील कर्जाच्या मर्यादा ठरविणे .

४) स्थानिक हिशेब तपासणीसाची नेमणुक करणे व त्याचे वेतन ठरविणे.

५) संस्थामार्फत घरगुती अगर इतर उपयोगाकरीता कोणत्या प्रकारच्या वस्तु पुरवावयाच्या ते ठरविणे व अशा पुरवठ्या बद्दल किती कमिशन व इतर खर्च घ्यावयाचा ते ठरविणे.

६) संस्थेची ऑडीट तपासणी यादी नियम क्रमांक ७३ मधील तरतदिनुसार समितीने तिच्यावर केलेले दोष दुरुस्ती प्रतिवृत्त (रिपोर्ट) तसेच सहकारी खात्याकडून व केंद्रिय सहकारी बँकेकडून आलेला पत्र व्यवहार यांचा विचार करणे.

७) उपविधी क्रमांक १० प्रमाणे सदस्यांना संस्थेतून काढून टाकण्याचे कामी कराव्याच्या उपाय योजनांचा विचार करणे.

८) नवीन उपविधी स्विकारणे, अंमलात असलेल्या उपविधीत बदल करणे किंवा काही उपविधी अजीबात गाळून टाकणे नियम क्रमांक ६० मध्ये उल्लेख केलेल्या गुप्त मतदान पध्दतीचा निवडणूकीचे विनिमय तयार करुन ते स्विकारणे,संस्थेचे अधिकारी व सेवक यांच्या नेमणुका वगैरे संबंधी समितीने केलेले विनीमय स्विकारणे.

९) उपविधी क्रमांक ६८ प्रमाणे कर्जाला एक वर्षापेक्षा अधिक मुदतीची तहकुबी देणे.

१०) वेळोवेळी सदस्यांना मालाच्या तारणावर आगाऊ रकमा (ॲडव्हान्सेस) देण्याबाबत समितीने तयार केलेल्या व इतर विनीमयांना मंजुरी देणे.

११) समितीच्या एका अगर अधिक सदस्यांना त्यांच्या कामाच्या मुदतीत साधारण सभेत हजर असणाऱ्या व मतदान करणाऱ्या दोनतृतीयांस सदस्यांच्या मताने समितीमधून कमी करणे.

१२) योग्य रितीने सभेपुढे आलेल्या इतर कामाचा निकाल करणे.

२७) गिऱ्हाईकी माल वाटप व तत्सम व्यवहारांची व्यवस्था पाहण्यासाठी एक स्वतंत्र उपसमिती राहील. संस्थेच्या समितीचा अध्यक्ष व तीचा एक सदस्य व केंद्रिय सहकारी बँकेचा प्रतिनीधी (बँकेचे कर्ज घेतलेले असल्यास ) असे या उपसमितीचे अधिकारपरत्वे (एक्स ऑफिसीयो) सदस्य असतील.

२८) अधिनियम कलम क्रमांक ७६ मधील तरतुदीनुसार संस्थेला विशेष साधारण सभा बोलावता येईल व त्याच तरतुदीनुसार ती बोलाविली पाहिजे. खालील परिस्थीतींत ती एक महिण्यातच बोलविली पाहिजे.

१) मे. असि /डेप्युटी रजिस्ट्रार यांनी तशी सूचना केल्यास.

२) संस्थेच्या एकूण सदस्यांचा एकपंचमाश सदस्यांनी लेखी मागणी केल्यास .

३) जिल्हा संस्था सामील झाली आहे अशा संयुक्त संस्थेच्या (तशी असल्यास) समितीने तशी सूचना केल्यास.

२९) साधारण सभांची कार्यरीती नियम क्रमांक ६० मधील तरतुदीनुसार राहील.

अ) वार्षीक साधारण सभेची चौदा दिवसांची व विशेष साधारण सभेची सात दिवसाची लेखी नोटीस व कार्यक्रम पत्रीका अशा सभेपूर्वी काढून संस्थेच्या सेक्रेटरीने ती सभा बोलाविली पाहिजे. अशा सभेची सूचना मे असि. /डेप्युटी रजिस्ट्रार यांना दिली पाहिजे. सभेची नोटीस व कार्यक्रम पत्रिका संस्थेच्या कचेरीत नोटीस बोर्डावर टाकून प्रसिध्द केली पाहिजे. नोटीशीत सभेची तारीख, नक्की वेळ,सभेचे ठिकाण व तीत केली जाणारी कामे ही नमुद केली पाहीजे . संस्थेच्या अध्यक्ष व त्याचे गैरहजेरीत उपाध्यक्ष व सेक्रेटरी यांनी नोटीशीवर सह्या केल्या पाहिजेत.

३०) साधारण सभेत हजर असलेल्या सदस्यांच्या संख्येच्या दोन तृतीयांश सदस्यांच्या परवानगीने कार्यक्रम पत्रिकेत दाखल नसलेली कामे कोणताही सदस्यास सभेपुढे मांडता येईल.

३१) कोणत्याही साधारण सभेत एकूण सदस्यांच्या संख्येच्या दोन पंचमांश अगर २५ (यापैकी कमी संख्या असेल तितके) सदस्य हजर असेल म्हणजे गणपूर्ती (कोरम) झाली असे समजले जाईल. सभेत गणपुर्ती झाली नसेल तर ती सभा सात दिवसा पर्यत पुढे ढकलली जाऊ शकेल व तीत मुळ सभेच्या कार्यक्रम पत्रिकेतील कामे केली जातील मग अशा सभेस गणपूर्ती असो वा नसो . सभेत काही कामे झालयावर कार्यक्रम पत्रिकेतील सर्व कामे त्या दिवशी करणे शक्य नसेल तर त्या सभेत हजर असणाऱ्या सदस्यांनी नियम क्रमांक ६० मधील तरतुदीनुसार त्या सभेत हजर असणाऱ्या सदस्यांनी ठरविलेल्या पण त्या भरलेल्या सभेच्या तारखेपर्यंत व ३० दिवसापेक्षा जास्त नाही अशा दुसऱ्या तारखेपर्यंत ती सभा पुढे ढकलता येईल. व अशा पुढे ढकलल्या सभेत कार्यक्रम पत्रिकेतील राहिलेले विषय विचारा करता घेतले जातील.

३२) उपविधी क्रमांक ३० व ३१ मध्ये काहीही तरतूद केली असली तरी संस्थेच्या सदस्याला वगळून टाकणे व अगर तीच्या समितीच्या सदस्याला समितीमधून दूर करणे अगर तिच्या उपविधीत बदल करणे या संबंधाच्या नियम क्रमांक ६० प्रमाणे करावयाची नोटीस,अधिनियम, नियम अगर संस्थेचे उपविधीयातील तरतूदीनुसार दिल्या शिवाय असा ठराव कोणत्याही साधारण सभेपुढे आणता येणार नाही.

३३) समितीचा अध्यक्ष साधारण सभा आणि विशेष साधारण सभा यांचा अध्यक्ष राहील. समितीचा अध्यक्ष गैरहजर असेल तर समितीचा उपाध्यक्ष त्या सभांचा अध्यक्ष राहील व हे दोघेही गैरहजर असतील तर सर्व साधारण सभेने आपला अध्यक्ष निवडला पाहिजे. ही निवड मतैक्य न झाल्यास हात उभारुन मतदानाने होईल.

३४) सर्व प्रकारच्या साधारण सभेत मतदान हात उभारुन केले जाईल. परंतु सभेत उपस्थित असणाऱ्या मतदानास पात्र अशा कमीत कमी दोन पंचमांश सदस्यांनी मागणी केल्यास मतदान गुप्त पध्दतीने घेण्यात येईल आणि अध्यक्ष मतपत्रिका देण्यसाठी व मतमोजणी करण्यासाठी आवश्यक ते उपाय योजतील व मतदानाचा निकाल जाहीर करतील .अध्यक्षास इतर सदस्याप्रमाणे एक मत असेल. एखाद्या ठरावावर मतदान सारखेच विभागले असेल तर अध्यक्षास एक निर्णायक मत देता येईल. ज्यांच्यावर स्वतःच्या कर्जाबद्दल झालेला निवाडा बजावणीस पाठविलेला असेल अशा सदस्याला समितीच्या व इतर निवडणुकीच्या प्रश्नावर मतदान करता येणार नाही.

३५) कोणत्याही पास झालेल्या ठरावात बदल करण्यासंबंधीचा ठाव साधारण सभेत पास झालेल्या मुळ ठरावाचे तारखेपासुन सहा महिन्याचे आत मे. असि. डेप्युटी रजिस्ट्रार यांचा परवानगी शिवाय कोणत्याही साधारण सभेत आणता येणार नाही.

३६) संस्थेने खाली दिलेल्या संस्थांना सामील होऊन त्याचे सदस्य झाले पाहिजे.

१) जिल्हा केंद्रिय सहकारी बँक अगर कोणतीही सहकारी बँक

२) जिल्हा सहकारी बोर्ड.

३) महाराष्ट्रातील सेवकांची सहकारी पत संस्थांची (तशी असल्यास) सहकारी संयुक्त संस्था.

संस्था ज्या संघाची सदस्य झाली असेल अशा संस्थांच्या साधारण सभांना संस्थेतर्फे तिच्या प्रतिनिधींनी हजर राहण्याबद्दल व तीत मत देण्याबाबत अधिनियम कलम क्रमांक २७ च्या तरतूदींना अधिन राहुन संस्थेने वेळोवेळी ठरविले पाहिजे.

३७) साधारण सभांचा वृत्तांत त्यांच्या वृत्तात पुस्तकात सेक्रेटरीने लिहून ठेवला पाहिजे.

# ७) समिती

३८) संस्थेच्या कामकाजाची व्यवस्था तिच्या समितीने पाहिली पाहिजे. समिती नव (९) सदस्यांची राहील. ह्या पैकी अनुसूचीत जाती जमाती व विमुक्त जातींचा एक व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ बबब नुसार महिला सदस्यांचा एक अशा दोन जागा राखीव राहतील. समितीचा कार्यकाल पाच (५) वर्षाचा राहील. ह्या कालावधीत समितीवर सदस्यांनी अविश्वात प्रकट केला नसला पाहिजे. सदर समितीची निवड मे.सहा/उपनिबंधक, सहकारी संस्था तालुका ह्यांनी केलेल्या व्यवस्थापक कमेटी च्या गुप्त मतदान पध्दतीच्या निवडणुक नियमानुसार केली जाईल. समितीचा कार्यकाल संपल्यानंतर दुसरी समिती निवडली जाईपर्यंत ही समीती काम पाहिल. समीतीच्या मुदतीत मृत्युमुळे व इतर कारणामुळे रिकाम्या झालेल्या जागा समितीच्या बहुमताने नेमणुका करुन भरल्या जातील.समितीचे पांच सदस्य हजर असले पाहिजे गणपूर्ती (कोरम) होईल.

३९) नियम क्रमांक ५८ मधील तरतुदीप्रमाणे समितीचा एखादा सदस्य समितीवर राहण्यास अपात्र ठरला असल्यास अगर त्यास फौजदारी गुन्हयाबद्दल शिक्षा झाली असल्यास त्यास समितीवर सदस्य म्हणून राहता येणार नाही.

४०) योग्य कारण दाखविल्यावाचून समितीच्या मते लागोपाठ चार सभांना एखादा सदस्य गैरहजर राहिल्यास तो समितीतून कमी झाला असे समजण्यांत येईल.

४१) समिती सदस्यांच्या व्यक्तीशः हितसंबंध असणाऱ्या बाबींचा विचार चालु असता त्याला समितीच्या सभेत हजर राहता येणार नाही.

४२) अधिनियम, नियम व संस्थेचे उपविधी यातील तरतुदी व साधारण सभांनी वेळोवेळी केलेले ठराव यानुसार संस्थेचे काम चालविण्यास समितीस पूर्ण अधिकार राहतील.

४३) समितीच्या सभेची लेखी सूचना व सभेचा कार्यक्रम सभेच्या पूर्वी निदान पाच दिवस आगोदर सेक्रेटरीने समितीच्या सदस्यांकडे पाठविला पाहिजे. अशा सभा अध्यक्षांच्या लेखी सूचनानुसार व संमतीने सेक्रेटरीने बोलावल्या पाहिजेत. मागणी करुनही अशा सभा बोलाविण्याचे कामी अध्यक्षांकाकडून टाळाटाळी होत असेल तर सभा बोलाविण्यासंबंधी समितीच्या बहुमताने दिलेला लेखी आदेश सेक्रेटरीवर बंधनकारक राहिल.

४४) पंचवार्षीक निवडणुकीनंतर होणाऱ्या पहिल्या सभेची नोटीस सेक्रेटरीने निवडणुकीनंतर १ महिन्याचे आंत काढावयास पाहिजे. पंचवार्षीक निवडणुकीनंतर होणाऱ्या पहिल्या सभेत समिती
खालील प्रमाणे पदाधिकारी निवडतील

१) अध्यक्ष २) उपाध्यक्ष ३) सेक्रेटरी ४) सहसेक्रेटरी. ह्या निवडणुकीनंतर अध्यक्षांनी सर्व सभांचा अध्यक्ष म्हणून काम केले पाहिजे. अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्षांना सभेचे संचालन करावे लागेल व या दोघांच्याही गैरहजेरीत सदस्यांनी आपल्यापैकी एकास ह्या सभेकरीता अध्यक्ष निवडला पाहिजे. अध्यक्षास सदस्य या नात्याने असलेल्या एका मताखेरीज समान मत प्रसंगी एक जादा मत देण्याचा अधिकार असेल. पुढील पंचवर्षीक निवडणुकीनंतर अध्यक्ष निवडला जाईपर्यंत हा अध्यक्ष साधारण सभा, विशेष साधारण सभा व समितीच्या सभांचा अध्यक्ष म्हणून काम करील मात्र ह्या मुदतीत समितीने त्याचेवर अविश्वास प्रगट केला नसला पाहिजे.

४५) संस्थेच्या कामाकरीता समितीच्या आवश्यक तितक्या सभा भरविल्या जातील. परंतु दरमाहा निदान एकतरी सभा भरविलीच पाहिजे. सभांचा वृत्तांत, सभांच्या वृत्तांत पुस्तकात सेक्रेटरीने लिहून ठेवला पाहिजे.

४९) समितीची कामे खालील शिवायच्याप्रमाणे असतील :-

१) सदस्य होण्यासाठी व भागासाठी आलेल्या अर्जांचा विचार करणे.

२) कर्ज काढणे, ठेवी स्वीकारणे व त्यांच्या बाबी ठरविणे

३) सभासदांच्या व कर्जाच्या ठेवींच्या रकमांना मंजूर देणे व आलेला माहूल [illegible] ठरविणे.

४) कर्ज अगर आगाऊ रकमा मागणी अर्जांचा विचार करणे.

५) कर्ज अगर आगाऊ रकमा देणे किंवा नाकारणे, ते व्याजाने असल्यास [illegible], किती मुदती पर्यंत व कोणत्या तारणावर द्यावयाचे ते अधिनियम कलम क्रमांक ४४ व नियम क्रमांक ४९ व ४६ मधील तरतुदी विचारात घेऊन ठरविणे.

६) विशिष्ट योजनापुरत्या अगर कामाकरीता उपसमित्या नेमणे.

७) कर्जाच्या विनीयोगावर देखरेख ठेवणे.

८) थकलेले कर्ज वसूल करण्याची तजविज करणे. कर्ज थकल्यास अगर अन्य रितीने [illegible] केल्याबद्दल सदस्यावर कशा रीतीने व कोणती उपाययोजना करावयाची ते ठरविणे.

९) तहकुबी मिळण्याकरीता आलेल्या अर्जांचा विचार करणे.

१०) संस्थेच्या कामासंबंधी होणारा खर्च मंजूर करणे.

११) सेक्रेटरीने हिशेब तपासणे व रोज शिल्लक मोजून पाहणे.

१२) अधिनियम कलम क्रमांक ७५ व नियम क्रमांक ६१ मधील तरतुदींनुसार [illegible] व [illegible] पत्रके वर्ष संपल्यापासून ४५ दिवसांत तयार करणे व ते तयार केल्यापासून १५ दिवसांत [illegible] व [illegible] साहेबांनी नेमेलेल्या त्या भागाचे ऑडीटर साहेब यांचेकडे पाठविणे.

१३) हिशोबनीस व इतर पगारी अधिकाऱ्यांना व सेवकांना नेमणे, त्यांच्या [illegible] व [illegible] श्रेणी (स्केल) ठरविणे अगर त्यात बदल करणे, त्यांना दंड करणे व तात्पुरते कामावरुन दूर [illegible] व या सर्व बाबत विनिमय तयार करणे ते साधारण सभेपुढे मंजूरीस ठेवणे. नोकराचे कामावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

१४) कायदेशीर कामे चालविणे. त्या कामासंबंधात प्रतिपक्ष किंवा पक्षांचा बाबतीत संयुक्त संस्थेच्या (जर असल्यास) समितीने तडजोड करणे. संस्थेतर्फे कायदेशीर कामे चालविण्याकरीता तिच्या अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना अधिकार देणे.

१५) आपल्या सदस्यांच्या गरजा अजमायून जरुर त्या व अगर घरगुती कामासाठी लागणाऱ्या जिन्नस खरेदी करण्याची तजबीज करणे व जरुर पडल्यास मागणी करणाऱ्या इसमाच्या खर्चाने व त्याच्या जोखमीवर त्या जिन्नस साठविण्याची वाटण्याची व विकण्याची तजविज करणे.

अ) उपविधी क्रमांक २(अ) प्रमाणे कामे हाती घेणे व त्याकरीता भांडवल पुरविणे. [illegible] करणे.

१६) मालाचे नोंदबुक तपासने व शिल्लक माल बरोबर आहे कींवा नाही ते पाहणे.

१७) संस्था वापरीत असलेले काटे, वजने, मापे इत्यादी यंत्रे तपासणे.

१८) संस्थेच्या कचेरीसाठी माल साठविण्यासाठी जागा संपादन करणे अगर भाड्याने घेणे.

१९) संस्थेचा माल साठविण्याची जागा व संस्थेचा माल याचे आगीपासून नुकसान होऊ नये म्हणून योग्य

बाजार दराने मे. रजिस्ट्रार को.सो. यांनी पसंत केलेल्या विमा कंपनी मध्ये विमा उतरविण्याची व्यवस्था करणे.

२०) कोणत्या मालाचे तारणावर आगाऊ रकमा द्यावयाच्या ते ठरविणे.

२१) ज्या सेवकांचा रोकडीशी, मालाशी, महत्वाचे कागदपत्राशी अगर रोख्यांशी संबंध येत असेल अशाचे कडून मे. रजिस्ट्रार साहेब यांनी ठरविलेल्या रकमेच्या प्रमाणानुसार जामीन रोखा घेणे, संस्थेने वाटल्यास त्याकरीता मे. रजिस्ट्रार यांनी पंसत केलेल्या विमा कंपनीकडून फायडेलिटी बॉन्ड घेण्याची व्यवस्था करणे.

२२) सहकारी ऑडिटरकडून तसेच स्थानिक हिशेब तपासणीसाकडून आलेल्या ऑडीट नोट यांचा आढावा विचारात घेणे, अधिनियम कलम क्रमांक ८२ व नियम क्रमांक ७३ मधील तरतुदीनुसार ऑडीट दोष दुरुस्तीचे प्रतिवृत्त नियमाच्या ''ओ'' नमुन्यात मे. असि /डेप्युटी रजिस्ट्रार यांचे कडे पाठविणे आणि ऑडीट यादी व दोष दुरुस्ती प्रतिवृत्त पुढील साधारण सभेपुढे ठेवने.

२३) भाग (शेअर्स) सरकारी व इतर रोख यांचेवर संस्थेचे वतीने शेरा लिहणे, ते विकणे अगर त्यांचा वर्ग करणे अथवा न करणे आणि त्याकरीता समितीच्या दोन अथवा अधिक सदस्यांना जरूर ते अधिकार देणे.

२४) कर्जफेड, वर्गणी इत्यादी रकमा गोळा करण्याकरता निरनिराळ्या ठिकाणी पोट- खजिनदार नेमणे व त्यांचे कामावर देखरेख ठेवणे.

२५) सर्वसाधारण पणे संस्थेचा व्यवहार चालविणे.

४७) समिती सदस्यांनी वरील कामे पार पाडण्याचे कामी हयगय केल्यास हयगयीमुळे होणाऱ्या संस्थेच्या नुकसानीस ते स्वतः वैयक्तीक रितीने जबाबदार धरले जातील.

४८) समिती किंवा समितीचा सदस्य यांच्या नेमणुकीचे वेळी काही दोष असल्याचे मागाहून नजरेस आले तरी समितीने अगर समितीचा सदस्य या नात्याने सद्भावनेने केलेली कामे ही जणू काही ती समिती अगर तो सदस्य यांची नेमणुक योग्य झाली असे समजून अधिनियम कलम क्रमांक ७७ मधील तरतुदीप्रमाणे कायदेशीर समजली जातील.

४९) समितीच्या निकालावर साधारण सेभेकडे त्या निकालाची समज दिल्याच्या तारखेपासून दोन महिन्याचे आत अपील करता येईल. त्या मुदती नंतर केलेले अपील साधारण सभा नामंजूर करील.

## ८) सेक्रेटरी

५०) सेक्रेटरीची नेमणुक उपविधी कलम क्रमांक ४४ प्रमाणे करण्यांत येईल व पुढील पंचवार्षीक निवडणुकीनंतर नविन सेक्रेटरीला पदभार सोपवीपर्यन्त त्याचा कार्यकाल राहील. उपविधी कलम क्रमांक ४४ प्रमाणे नविन समिती स्थापन झाल्यापासून सात दिवसाचे आत प्रभार नविन समितीला सोपविण्याची संयुक्त जबाबदारी सेक्रेटरी व अध्यक्ष यांची राहील.

५१) नियम क्रमांक ५७ मधील तरतूदीप्रमाणे संस्थेच्या एखाद्या करारात/ व्यवहारात खरेदी केलेल्या अगर विकलेल्या मिळकतीत सेक्रेटरीला कसलाही भाग अगर हितसंबंध ठेवता येणार नाही.

५२) सेक्रेटरीची कामे खालील प्रमाणे असतील :-

१) संस्थेच्या साधारण सभा व समितीच्या सभा बोलावने व त्यांना हजर राहणे.

२) अशा सभात होणाऱ्या कामाच्या नोंदी वृत्त पुस्तकात करणे.

३) समितीच्या हुकमाने पैसे खर्च करणे व येतील त्या रकमा घेणे

४) नियम क्रमांक ६५ मध्ये नमुद केलेली संस्थेची सर्व पुस्तके व हिशेब वेळोवेळी लिहून ठेवणे.

५) जमा खर्चाच्या सर्वांच्या पावत्या (व्हाऊचर्स) व संस्थेचे काम चालविण्याकरीता लागणारे इतर सर्व कागदपत्र तयार करणे.

६) नियम क्रमांक ६१ व ६२ या प्रमाणे वार्षीक ताळेबंद पत्रक ठरलेल्या मुदतीच्या आत तयार करुन समितीपुढे ठेवणे व ते रजिस्ट्रारने नेमलेल्या भागाच्या ऑडीटरकडे मुदतीत पाठविणे.

७) संस्थेचा पत्र व्यवहार चालविणे व सदस्यांना लागणारी जरुर ती माहीती पुरविणे.

८) ऑडीट तपासणी बाबी आल्यानंतर ताबडतोब ती समीतीच्या विचाराकरीता तीच्यापुढे ठेवणे व तिच्यात दाखविलेले दोष व चुका दुरुस्त करणेबाबत जरुरी ती तजवीज करणे व नियम क्रमांक ७२ प्रमाणे दोष दुरुस्ती प्रतिवृत्त ठरलेल्या मुदतीच्या आत समितीपुढे ठेवून ती पाठविण्याची व्यवस्था करणे.

९) संस्थेच्या इतर कर्मचाऱ्यांना कामाच्या दिशा दाखविणे त्यांच्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.

१०) सदस्यांनी संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या नोंदी ठेवणे, पास बुके वेळोवेळी भरुन त्यांना देणे व इतर सदस्यांना व ठेवीदारांना संस्थेशी झालेल्या त्यांच्या व्यवहारांच्या तिमाही पत्रकाच्या कार्बन प्रती देणे व ठेवींच्या बाक्या बरोबर आहेत किंवा नाही ते समजण्याकरीता ठेविदारांना दर वर्ष अखेरच्या बाक्या कळविणे व त्या बरोबर असल्याबद्दलची त्यांची कबूली पत्रके घेऊन दप्तरी ठेवणे व पुढील ऑडीट तपासाचे वेळेत ऑडीटरास दाखविणे.

११) संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या रकमेच्या पावत्यावर सेक्रेटरीने सह्या केल्या पाहिजेत. भागाचे दाखले दस्तऐवज व इतर महत्वाची कागदपत्रे यावर सेक्रेटरीने व समितीचा एक सदस्य यांनी सह्या करुन दिल्या पाहिजेत.

१२) सेक्रेटरीच्या गैरहजेरीत त्याची तात्पुरती कामे सहसेक्रेटरी पाहिल.

५२) (अ) सेक्रेटरीने वरील कामे पार पाडण्याचे कामी हयगय केल्यास हयगयीमुळे होणाऱ्या संस्थेच्या नुकसानीबद्दल त्याला वैयक्तीक रीतीने जबाबदार धरले जाईल.

५३) संस्था आपल्या कर्मचाऱ्यासाठी भविष्यनिधी स्थापन करील व तो निधी सुस्थितीत ठेवण्यासंबंधीचे व त्याचा उपयोग करण्यासंबंधीचे विनीमय मे. असि./डेप्युटी रजिस्ट्रार यांचे पूर्व संमतीने तयार करील.या निधीची स्थापना व त्याची व्यवस्था अधिनियम कलम क्रमांक ७१ व नियम क्रमांक ५६ मधील तरतुदी प्रमाणे केली जाईल.

## ९) सदस्यांच्या नेहमीच्या गरजा भागविण्यासाठी द्यावयाचे कर्ज

५४) संस्थेने द्यावयाचे सर्व प्रकारच्या कर्जाचे व्यवहार अधिनियम कलम क्रमांक ४४ आणि नियम क्रमांक ४१ ते ४३ व ४५ ते ४७ मधील तरतुदींना अधीन राहुन केले जातील. संस्थेच्या सदस्यानांच फक्त कर्ज दिले जाईल.

५५) कर्जासाठी करावयाच्या अर्जात आपणास किती कर्ज, कशासाठी, किती मुदतीपर्यंत व कोणत्या तारणावर पाहिजे हे प्रत्येक अर्जदाराने नमुद केले पाहिजे. अशा अर्जाचा योग्य तो निर्णय समिती करील.

५६) संस्थेकडे मुदतीची ठेव ठेवणाऱ्या सदस्यास व ठेवीदारास त्यांच्या मागणी प्रमाणे त्याचे ठेवीचे तारणावर ठेव रकमेच्या ९० टक्केपर्यंत कर्ज देता येईल. अशा कर्जावर ठेव ज्या व्याजाच्या दराने ठेवलेली आहे त्यापेक्षा एक टक्का अधिक व्याज आकारले जाईल.

५७) सदस्यास कर्ज मंजुर करण्यापूर्वी खालील एक अगर जास्त प्रकारचे तारण करुन घेण्यात येईल.

अ) स्थावर मिळकतीवर बोजा.

ब) १ अगर २ लायक इसम जामीन घेऊन.

क) ठराविक मुदतीची वचन चिठ्ठी ( प्रॉमिसरी नोट) कर्जास तारण घेऊन.

ड) संस्थेच्या चालकाची हमी (एम्प्लॉयर्स गॅरंटी) घेऊन.

५८) संस्थेकडून मिळणाऱ्या जास्तीत जास्त कर्ज मर्यादेपर्यंतच्या रकमेचा, कर्ज घेणाऱ्या प्रत्येक सदस्यांनी आपल्या आयुष्याचा विमा उतरला पाहिजे व आपली विमा पॉलीसी संस्थेच्या नावे तिच्याकडून घेतलेल्या कर्जाकरीता जादा तारण म्हणून वर्ग करून दिली पाहिजे. या करीता विमा कंपनीचा अगर सहकारी संस्थांचा अभिकर्ता (एजंट) म्हणून संस्थेस काम करता येईल.

५९) कर्ज घेण्यापूर्वी कर्ज घेणाऱ्या सदस्याने दुसऱ्या समान संस्थेकडून कर्ज घेतले नाही याची खात्री करून दिली पाहिजे.

६०) संस्थेच्या सभासदास द्यावयाच्या सर्वप्रकारच्या कर्जाची मर्यादा रु. ६०,००० ह्या मर्यादेपेक्षा अधिक असता कामा नये. संस्थेच्या सभासदासच कर्ज देता येईल.

**१) अल्पमुदत कर्जे** :- कर्ज घेणाऱ्या सभासदाला त्याचे एकूण पगाराचे (मुळ पगार व महागाईभत्ता) ३० पर्सेंटच्या १२ पटीएवढी परंतु १०,००० (अक्षरी रुपये दहाहजार) पेक्षा जास्त नाही इतके अल्पमुदत कर्ज जास्तीत जास्त १२ मासीक हप्त्याच्या परतफेडीच्या कराराने खालील कारणाकरीता देता येईल.

१) दैनंदिन गरजेच्या वस्तु खरेदीसाठी

२) सायकल, रेडीओ, टि.व्ही. फर्निचर इ.वस्तु खरेदीसाठी

३) आजारपणा करीता

**२) सर्व साधारण कर्जे** :- सभासदाने धारण केलेल्या भागाच्या २० पट अगर एकूण पगाराच्या ३० पट परंतु कमाल रु. ६०.००० /- पेक्षा अधिका असु नये. असे कर्ज मंजुर केल्यास वसूल करण्यात येणारा हप्ता व वेतनातून एकूण होणारी कपात हि त्यांच्या वेतनाच्या १ / ३ पेक्षा जास्त असणार नाही. असे कर्ज -

१) लग्न, मौंजी करीता

२) उच्च शिक्षणाकरीता

३) घरबांधणी, घरदुरुस्ती व जागा घेण्याकरीता देता येईल.

परंतु २५,०००/- पेक्षा रकमेचे कर्ज द्यावयाचे झाल्यास. सत्र कर्ज स्थावर मिळकत खरेदी करणे, मुलामुलांचे लग्न व धार्मिक कार्यक्रम, पाल्यांचे उच्च तांत्रिक शिक्षण (वैद्यकीय,अभियांत्रिकी), परदेशातील शिक्षण, हृदयशस्त्रक्रिया इत्यादी खर्चिक वैद्यकीय उपचार या कारणांसाठी देता येईल. सदर कर्ज जास्तीत जास्त ६० समान मासीक हप्त्यांत वसूल केले जाईल.

**३) तत्कालीन (आकस्मिक ) कर्जे** :- कोणत्याही सभासदास एका सभासदाच्या जामीनावर तत्कालीन (आकस्मिक) कर्ज रु. २०००/- एवढे सेक्रेटरीला तात्काळ मंजूर करून देता येईल व त्याकरीता कार्यकारी मंडळाची मंजुरी मासीक सभेत मागाहून घेण्यात येईल. हे कर्ज जास्तीत जास्त १० मासीक हप्त्यात परत करावे लागेल. व खालील कारणांकरीता दिले जाईल.

अ) आकस्मिक आजार

ब) अपघात

क) मृत्यु

ड) शिक्षण इ. करीता.

टिप :- १) सभासदाचे पुर्विच्या कर्जाची संपुर्ण व्याजासह परतफेड केल्याशिवाय नवीन कर्ज देण्यास पात्र धरु नये.

२) एका सभासदाला जेव्हा दुसऱ्या सभासदास जामीन राहावे लागते त्यावेळेस त्या सभासदाची वर नमुद केल्याप्रमाणे ठरविण्यात येणारी व्यक्तीगत कर्ज मर्यादा म्हणून धरण्यात यावी. एक सभासद जास्तीत जास्त ३ सभासदांना वरील मर्यादेपर्यंत जामीन राहू शकतो.

३) कर्ज देतेवेळी वेळेस अँक्टमधील तरतुदीचे पालन करण्यात येईल.

४) कर्जदारास मंजूर झालेली रक्कम तो दोन किंवा तीन हप्त्यात उचलू शकेल.

५) उपविधी क्र. ६० मधे दर्शविलेली कमाल कर्ज मर्यादा जरी रु. ६०,०००/- असली तरी समिती संस्थेजवळ उपलब्ध असलेल्या पैशांच्या उपलब्ध असलेल्या पैशांच्या उपलब्धतेनुसार वेळोवेळी कमाल कर्जमर्यादा - पण रु. ६०,०००/- पेक्षा अधिक नाही. -ठरविल.

६१) कर्ज घेतल्याच्या तारखेपासुन सारख्या ठरविण्यात आलेल्या मासिक हप्त्यात प्रत्येक सदस्याने आपल्या कर्जाची फेड केली पाहिजे.

६२) धंद्यासाठी व घरगुती कामासाठी लागणाऱ्या जीनसा व माल खरेदी करण्यासाठी द्यावयाची कर्जे संस्थेमार्फत पुरविल्या जाणाऱ्या त्या त्या मालाच्या रुपाने दिली जातील.

६३) संस्थेच्या सकितीच्या सदस्याकडून येणे असलेली एकूण रक्कम सर्व सदस्याकडील येणे असलेल्या एकूण रक्कम;च्या एक दशांश पेक्षा केव्हाही जास्त असणार नाही.

६४) कर्जावरील कमाल व्याजाचा दर संस्था ज्या बँकेकडून कर्ज घेईल अगर घेऊ शकते त्या बँकेच्या व्याजाच्या दरापेक्षा दरसाल दर शेकडा २ (दोन) % ने जास्त राहील. कर्जावरील व्याजाचा दर आमसभा वेळोवेळी ठरविल. तेवढा, परंतु वरील कमाल मर्यादेपेक्षा अधिक नाही राहील. व्याजाची आकारणी कर्ज दिल्याचे तारखेपासून ते कर्जफेडीचे तारखेपर्यंत केली जाई. अपूर्ण महिन्याबद्दल १६ पेक्षा कमी दिवस असल्यास अर्धा महिना व १६ अगर अधिक असल्यास पूर्ण महिना समजण्यात येईल.

६५) एका कारणासाठी दिलेली रक्कम कर्जदाराने दुसऱ्याच कामास लावल्यास ती सर्व रक्कम वसुली तारखेच्या व्याजसह ताबडतोब परत मागण्याचा अधिकार नियम क्रमांक ४६ ला अनुसरुन समितीस राहील. कारणाबाबतचा समितीचा निकाल अखेरचा समजला जाईल. असा अर्जदार दोन वर्षापर्यंत पुन्हा कर्ज घेण्यास अपात्र ठरेल

६६) कर्जास जामीन राहीलेला इसम मरण पावला किंवा समितीच्या मते बेलायक ठरला तर दुसरा लायक जामीन आणून देण्यास त्या कर्जदारास लेखी कळविण्यांत येईल. जर असा दुसरा जामीन आणला नाही तर त्याचे सर्व कर्ज वसुलाचे तारखेपर्यंतच्या व्याजासह तावडतोब परतफेड केले जाण्यास पात्र ठरेल.

अ) जर एखाद्या कर्जदाराने कर्जफेडीचे लागोपाठ ३ अगर जास्त हप्ते थकविले अगर उपविधी क्रमांक १० अगर ११ अन्वये तो संस्थेतून कमी झाला अगर दुसऱ्या कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेचे त्याने कर्ज काढले तर त्याचे कडील सर्व कर्ज तावडतोब परतफेड करुन घेण्यास समितीचा अधिकार राहील.

६७) कर्जदाराच्या स्वत:च्या कोणत्याही चुकीवर अवलंबुन नसलेल्या अशा योग्य कारणामुळे कर्जदाराला कर्जफेड

ता.अचलपूर, जि.अमरावती

नसता आली नाही, तरी समितीची खात्री झाल्यास व त्याने तहकुबी मिळविण्याकरिता अर्ज केल्यास जास्तीत जास्त ६ महिनेपर्यंत त्या कर्जाची मुदत वाढविण्याचा समितीला अधिकार आहे. संस्थेने केंद्रीय बँकेचे देणे असेल तर तिच्या मंजुरीने संस्थेच्या साधारण सभेला ६ महिन्यावरील मुदत देता येईल. कर्जाला जामीनदार असल्यास त्यांच्या लेखी संमतीशिवाय कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. या कामी टाळाटाळ अगर हयगय होऊन संस्थेचे नुकसान झाल्यास सदस्य व सेक्रेटरी हे नुकसान भरपाईस जबाबदार राहतील.

६८) कर्जफेडीची मुदत संपल्यानंतर कर्जाचा वसूल न आल्यास व कर्जास तहकुबी दिली नसल्यास मूळ कर्जदार व त्याचे जामीनदार (जामीनदार घेतलेले असल्यास) यांना कर्ज वसुलीची नोटीस देण्यात येईल. नोटीसीत नमूद केलेल्या मुदतीत रक्कम भरलीच पाहिजे असा आदेश नोटीसीत दिला जाईल. सदर मुदतीत समाधानकारक वसुली न आल्यास त्या कर्जदारावर लवाद दावा दाखल केला जाईल. लवादाने कर्जदाराविरुद्ध दिलेल्या हुकूमनाम्यावर (निवाड्यावर) अपील केले नसल्यास अगर पैसे भरण्याबद्दल हुकुमनाम्यात मुदत दिली नसल्यास अगर हुकूमनामा झाल्यानंतर समाधानकारक वसूल आला नसल्यास अगर याकरिता मुदत दिली नसल्यास तो हुकूमनामा तावडतोब बजावणीस पाठविला जाईल. तो पाठविण्याची जबाबदारी समितीवर राहील. अपीलात मिळालेल्या निवाड्याच्या बजावणीबाबतही या प्रमाणेच कारवाई केली जाईल.

६९) अ) वरील तरतुदी विचारात घेऊन प्रत्येक कर्ज घेणाऱ्या सभासदाकडून कर्जरोखा अगर गहाणखत अगर दोन्हीही प्रथम लिहून घेतले जाईल. त्यानंतरच प्रत्यक्ष कर्जाची रक्कम दिली जाईल.

ब) कर्ज फेडीसाठी कर्जरोख्यात ठरविलेल्या तारखेच्या दिवशी अगर वाढवून दिलेल्या मुदतीच्या अखेरच्या दिवशी कर्जाच्या रकमेची फेड न झाल्यास ती तारीख ही त्या थकबाकीची तारीख समजली जाईल.

७०) संस्थेकडून घेतलेल्या कर्जाची अगर जामिनकीची जबाबदारी संपेपर्यंत मी माझ्या भागाच्या सभासदत्वाचा राजीनामा देणार नाही. अशा अर्थाचा करारनामा कर्जदाराने कर्ज घेण्यापूर्वी करून दिला पाहिजे.

## १०) ठेवी

७१) बचत (सेव्हिंगज) ठेव फक्त सदस्यांकडून संस्थेस स्वीकारता येईल.

७२) बचत ठेवीचे व्यवहार खालील अटीवर केले जातील.

१) बचत ठेवीत ठेवण्याच्या रकमेवर कमाल मर्यादा नाही.

२) एका वेळी १० रुपयापेक्षा कमी ठेव स्वकारली जाणार नाही.

३) वर्षभरात फक्त तीन वेळेसच बचत ठेवीतून पैसे काढता येतील.

४) बचत ठेवीतून पैसे काढण्यासाठी रीतसर अर्ज करावा लागेल.

व रक्कम घेतांना ठराविक नमुन्यात पावती लिहून द्यावी लागेल.

५) ठेवीतून पैसे काढतांना बचत खात्यात कमीत कमी रुपये २०/- असणे आवश्यक राहील.

६) बचत ठेवीवरील व्याजाचा दर वेळोवेळी साधारण सभा ठरविल तो राहील.

७३) **मुदतीच्या ठेवी -**

१) कोणत्याही व्यक्तीकडून किंवा संस्थेकडून सहा महिन्यापेक्षा कमी नाही अशा मुदतीच्या ठेवी संस्थेस स्वीकारता येतील.

२) मुदत ठेवीवर व्याजाचा दर आमसभा वेळोवेळी ठरवील. परंतु तो कोणतीही बँकेच्या ठेवीवरील व्याजाच्या दरापेक्षा जास्त असणार नाही.

३) पुन्हा ठेव स्विकारणे हे संस्थेला बंधनकारक राहणार नाही.

४) मुदतीपूर्वी ठेव परत केली जाणार नाही. परंतु ठेवीदारास त्याच्या ठेवीवर उपविधी क्रमांक ५१ प्रमाणे कर्ज देता येईल.

७३) ठेवी मागणीने केव्हाही परत करता याव्यात म्हणून तात्काळ पैसा (ल्युइड रिसोर्सेस) हाती यावा अशा तऱ्हेने नियम क्रमांक ४१ मधील तरतुदींना अधीन राहून आपल्या भांडवलाची गुंतवणुक संस्थेने केली पाहिजे.

## ११) नफ्याची वाटणी

७४) संस्थेचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च असे राहील. प्रत्येक वर्षअखेरचे हिशोब तयार झाल्यावर संस्थेच्या ढोबळ नफ्यातून अधिनियम कलम क्रमांक ६५ व नियम क्रमांक ५१ मधील तरतुदीनुसार निरनिराळ्या खर्चाच्या रकमा, अधिनियम कलम क्रमांक ७१ प्रमाणे सेवक निधिसाठी संस्थेने दिलेली अंशदाने व लेखापरीक्षणाच्या रकमा वजा करून संस्थेच्या निव्वळ नफ्याचा आकडा काढला जाईल व तो नफा लगतच्या पुढील वार्षिक साधारण सभेत जाहीर केला जाईल.

७५) अधिनियम कलम क्रमांक ६४ ते ६९ व नियम क्रमांक ५० ते ५२,५३ व ५५ मधील तरतुदींना अधीन राहुन निव्वळ नफ्याची विभागणी खालील बाबीवर केली जाईल.

१) कमीत कमी २५ टक्के गंगाजळीकरीता (रिझर्व फंड)

२) जास्तीत जास्त १५ टक्के दराने लाभांश वाटण्यासाठी. सदस्यांना द्यावयाच्या लाभांशाचा दर ९ टक्केपेक्षा जास्त असेल तर ९ टक्के दराने गणना करण्यात आलेल्या लाभांशाच्या भागापेक्षा अधिक होईल ती रक्कम, संबधित सदस्यांच्या भाग -लेखात (शेअर आकाऊंट) जमा करण्याबाबत साधारण सभेत निर्णय घेता येईल.

३) भाग भांडवलाच्या जास्तीत जास्त २ टक्के नियम क्रमांक ५२ प्रमाणे उभारावयाच्या अधिलाभांश समिकरण निधिसाठी.

४) भाग भांडवलाच्या जास्तीत जास्त २ टक्के नियम क्रमांक ५२ प्रमाणे उभारावयाच्या अधिलाभांश (बोनस) समिकरण निधिसाठी.

५) नियम क्रमांक ५३ अन्वये द्यावयाच्या शिक्षण निधिसाठी.

६) नफ्याच्या १ टक्का तारणपत्र किंवा चढ उतार निधिसाठी.

७) नफ्याच्या २० टक्के पर्यंत अधिनियम कलम क्रमांक ६९ प्रमाणे सार्वजनिक धर्मादाय कामासाठी.

वरील बाबीवर विभागून शिल्लक राहीलेला नफा खालील बाबीवर विभागता येईल.

१) शिल्लक नफ्याच्या २० टक्के पर्यंत विनावेतन काम करणाऱ्यांना मानधन देण्यासाठी.

२) शिल्लक नफ्याच्या २० टक्केपर्यंत संस्थेच्या प्रत्येक कर्मचाऱ्यास जास्तीत जास्त २ महिन्याच्या पगाराएवढा अधिलाभांश (बोनस) वाटण्यासाठी.

३) शिल्लक नफ्याच्या ३० टक्के पर्यंत इमारत निधिसाठी.

४) शिल्लक नफ्याच्या ३० टक्के इतर उपयुक्त कामासाठी विभागून शिल्लक नफा पुढील वर्षाच्या नफ्यात मिळविण्यासाठी पुढे ओढला जाईल.

७६) लाभांश जाहीर केल्यानंतर ३ वर्षाचे आत लाभांशाची रक्कम घेवून जाण्याबद्दल नोटीस दिल्याच्या तारखेपासुन ३ महिन्याचे आत सदर रक्कम न नेल्यास ती गंगाजळीत जमा केली जाईल.

... सहकारी संस्था ...

७७) गि-हाईक माल वाटप व्यवहारात झालेला निव्वळ नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे केली जाईल.

१) २५ टक्के - वाटप व्यवहार गंगाजळीसाठी.

२) ३५ टक्के - विशेष विकास निधीसाठी.

३) ४० टक्के - संस्थेच्या निव्वळ नफ्यात वर्ग करण्यासाठी.

वरील क्रमाकं २ मधील निधिची रक्कम मे. असि/डेप्युटी रजिस्ट्रार यांच्या आगाऊ परवानगीशिवाय खर्च करता येणार नाही. सदर रक्कम २ वर्षात खर्च न झाल्यास ती वाटप गंगाजळीत सामील केली जाईल.

७८) नियम क्रमांक ५३ मधील तरतुदीनुसार संस्थेने राज्य सरकार जाहीर करील अशा संस्थेच्या शिक्षण निधिसाठी अंशदानाची रक्कम भरल्याशिवाय तिला लाभांश वाटता येणार नाही.

७९) ज्या सदस्यांनी भागाची रक्कम पूर्ण भरली नसेल त्यांना लाभांश व अधिलाभांशांची क्कम रोकड न देता त्यांच्या भागाची रक्कम पूर्ण होईपर्यंत त्यांच्या भागात जमा केली जाईल.

## १२) गंगाजळी (रिझर्व फंड)

